महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००

E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक : २६/०८/२०२३

## ३० वी वार्षिक पोलीस क्रिडा स्पर्धा संपन्न
## आदिवासी विकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांचे हस्ते बक्षीस वितरण

---

३० वी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा ही दि. २३/०८/२०२३ ते दि. २५/०८/२०२३ या कालावधीत पोलीस मुख्यालय आडगाव येथील कवायत मैदानावर पार पडली. या स्पर्धेत एकूण ११० पुरूष व ३५ महिला पोलीस खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यात सांघिक खेळामध्ये हॉकी, फुटबॉल, कबड्डी, खो-खो, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल, क्रॉसकंट्रीइ या खेळांचा समावेश होता, तर वैयक्तिक क्रिडा प्रकारात ॲथेलॅटीक्स, कुस्ती, बॉक्सींग, वेटलिफ्टींग, ज्युदो, स्विमिंग हे खेळ खेळले गेले. दिनांक २५/०८/२०२३ रोजी या क्रिडा स्पर्धांचा आदिवासी विकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांच्या शुभहस्ते व नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांचे प्रमुख उपस्थितीत समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिर्थीच्या हस्ते विजेत्या पोलीस खेळाडूंना बक्षीस वितरण करण्यात आले.

सदर क्रिडा स्पर्धेचे स्वागत आणि प्रस्ताविक पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी सादर केले. सदर प्रस्ताविकात ग्रामीण पोलीसांनी यापुर्वी विविध क्रीडा प्रकारांमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची माहीती दिली. यावेळी आदिवासी विकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन केले तसेच नाशिक ग्रामीण घटकातील पोलीसांनी अनेक क्रीडा प्रकारात विविध पातळीवर केलेल्या कामगिरीचे कौतुक केले. जीवनात खेळांना अनन्य साधारण महत्व आहे, खेळाकडे तरूणांनी व्यावसायीक दृष्टीकोनातून पहाण्याची संधी अलीकडे उपलब्ध झाली असल्याचे सांगून महाराष्ट्रातील खेळाडूंनी केलल्या कर्तबगार कामगिरीच्या जोरावर विविध सरकारी नोक-यांत देखील स्थान मिळविले असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. नाशिक ग्रामीण घटकातील खेळाडू पुढे परिक्षेत्रीय पातळीवर सहभागी होणार असल्याने त्यांना पुढील वाटचालीसाठी श्रीमती नयना गुंडे यांनी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे यांनी केले.

सदर क्रिडा स्पर्धेची जनरल चॅम्पियनशिप पुरुष - पोलीस मुख्यालय संघास, तर महिलांची जनरल चॅम्पियनशिप नाशिक ग्रामीण पोलीस विभागास मिळाली. बेस्ट ॲथलिट म्हणून पुरुष खेळाडू सावळाराम शिंदे व महिला खेळाडू पल्लवी कुवर यांना गौरविण्यात आले. सदर क्रिडा स्पर्धांचे मनोरंजन वाढविण्यासाठी न्यु इंग्लिश स्कुल आडगाव येथील विद्यार्थीनींच्या लेझीम पथकाने नृत्य सादरीकरण केले.

यावर्षी नाशिक ग्रामीण घटकातील खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये पोलीस विभागासाठी नावलौकीक मिळवुन दिला आहे. कझाकिस्तान या देशाची राजधानी असलेल्या अस्ताना शहरात ०२ जुलै २०२३ रोजी पार पडलेल्या आयर्नमॅन स्पर्धेत नाशिक ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अंमलदार पोकॉ अक्षय पाटील यांनी १४ तास २७ मिनिटांत सदर स्पर्धा पुर्ण करून आयर्नमॅन हा मानाचा किताब मिळविला आहे. यावेळी प्रमुख अतिर्थीच्या हस्ते त्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

सदर पोलीस क्रिडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडूंची आगामी होणा-या परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धांकरीता निवड करण्यात आली. परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत यश मिळविणा-या खेळाडूंना महाराष्ट्र पोलीस दलात स्थान मिळणार असून त्यातून अखिल भारतीय पोलीस क्रीडांकरीता निवड होणार आहे. सदर स्पर्धेत उपस्थित खेळाडूंना नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस प्रशिक्षक सपोउनि श्री. समाधान गवळी, सहायक पोलीस क्रिडा प्रशिक्षक श्री. अमोल देखमुख यांचे मार्गदर्शन लाभले.